# चाणक्य मंडल परिवार

## प्रश्नपुस्तिका

## CSAT

**एकूण प्रश्न : 50**

**वेळ : 1 तास** **एकूण गुण : 125**

### सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

चाणक्य मंडल परिवार

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (प्र. क्र. 1 ते 5)**

कुवेतच्या समस्येदरम्यान 'नवीन जागतिक व्यवस्था' हा शब्दप्रयोग जागतिक व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी वापरला गेला. पुढे सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर 'सोव्हिएत रशियानंतरचे युग' आणि 'शीतयुद्धोत्तर कालखंड' हे दोन शब्दप्रयोग वापरात आले. 1991 नंतरच्या राजकीय आणि सुरक्षाविषयक व्यवस्थेचे वर्णन करणारे हे शब्दप्रयोग होते. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात एक नवीन शब्दप्रयोग पुढे आला, तो म्हणजे 'जागतिकीकरण'. हा शब्दप्रयोग अधिक व्यापक स्वरूपाचा होता. 1991 नंतरच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, तंत्रज्ञान आणि विचारप्रणाली विषयक बदलांचा यात समावेश केला जात होता. आज आपण शीतयुद्धात तर कालखंडाचे वर्णन करताना जागतिकीकरण हा शब्दप्रयोग वापरतो.

जागतिकीकरणाबद्दल आपण बोलतो तेव्हा परस्परांशी जोडलेल्या जागतिक व्यवस्थेबद्दल आपण बोलत असतो. या व्यवस्थेला तंत्रज्ञानातील विकासाची मदत होते. उदा., परदेशातील महाविद्यालयात किंवा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी आता ऑनलाईन प्रवेश घेता येतात. तसेच आपल्याला मित्र-मैत्रिणींशी आणि कुटुंबियांशी जगाच्या कोणत्याही भागातून व्हॉटस्अॅप किंवा मोबाइलद्वारे संवाद साधता येतो. आर्थिक व्यवहार आणि व्यापाराच्या संदर्भात देखील बदल झालेले दिसून येतात. भारतातून फुले आणि फळे युरोप, अमेरिकेला निर्यात होतात, तर भारतीय बाजारपेठेत युरोप, अमेरिका किंवा चीनसारख्या देशातून ग्राहकोपयोगी वस्तू येतात.

जागतिकीकरणाने राष्ट्र आणि राष्ट्रातील लोक एकमेकांशी जोडले आहेत. जगात एखाद्या ठिकाणी होणाऱ्या घटनांचा दुसरीकडे प्रभाव पडताना दिसून येतो. या बदलांकडे पाहण्याचे अनेक दृष्टिकोन आहेत. एकमत असे आहे, की जरी आपण जागतिक पातळीवर एकमेकांशी जोडले गेलो असलो, तरी 'राज्य' व्यवस्थेचे महत्त्व कमी झालेले नाही. किंबहुना, राष्ट्रवादाला आज देखील महत्त्व आहे. काही तज्ज्ञांच्या मते, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्राने राष्ट्रांना एकमेकांच्या जवळ आणले आहे. त्यांच्यामते, राष्ट्राचे सार्वभौमत्व तसेच अधिकार क्षेत्राच्या संकल्पेनांना आज आव्हान दिले जात आहे. नागरी समाज आणि बिगर राजकीय अभिकर्ते महत्त्वाचे झाले आहेत. आज सामाजिक चळवळी ज्या मानवी समस्यांवर भर देतात, त्या राष्ट्रांच्या सीमा छेदून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करतात.

गुंतवणूक हा अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहे. उद्योग धंद्यांना भांडवलाची गरज असते. भांडवली गुंतवणुकीतून उद्योगांची उभारणी करता येते. उद्योगांमध्ये भांडवली गुंतवणूक ही केवळ सरकारी पातळीवरच नव्हे तर खासगी क्षेत्रांतून देखील होत असते. भारतीय कंपन्यांनी इतर देशांमध्ये गुंतवणूक केल्याचे तुम्ही वाचले असेलच. जसे की, टाटा किंवा रिलायन्स सारख्या खासगी कंपन्या भारतातच नव्हे तर अमेरिका, युरोप, आफ्रिका या राष्ट्रांत देखील गुंतवणूक करतात. ONGC सारख्या सरकारी कंपन्या देखील परदेशात गुंतवणूक करतात. तसेच अनेक परदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करत आहेत. ही गुंतवणूक पायाभूत सुविधा तसेच ग्राहकोपयोगी अशा दोन्ही क्षेत्रांत होताना दिसून येते. परदेशी कंपन्यांनी भारतात विमानतळ, आण्विक प्रकल्प इत्यादींमध्ये गुंतवणूक केली आहे. त्याचबरोबर मॅकडोनल्ड, बर्गर-किंग, पिझ्झाहट सारख्या कंपन्या ग्राहकोपयोगी क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत.

1990च्या दशकापूर्वी अशा तऱ्हेची गुंतवणूक क्वचित होत होती. त्याकाळी सरकारी नियमांचे अडथळे होते. ते अडथळे आता दूर झाले आहेत. हा बदल टाटा जॅग्वार लँडरोव्हरचा कारखाना, युनाइटेड किंग्डम ONGC विदेश लि., व्हिएतनाम मायक्रोसॉफ्ट, भारत नेस्ले उद्योग, भारत भारतातील परकीय गुंतवणुकीची उदाहरणे म्हणजे भांडवली गुंतवणुकीचा मुक्तसंचार आहे. भांडवली गुंतवणूक भारतातून परदेशात आणि परदेशातून भारतात दोन्ही बाजूने होते. भारत हे एक विकसनशील राष्ट्र आहे. भारताला विकास साधण्यासाठी उद्योग क्षेत्रांमध्ये वित्तीय गुंतवणूकीची गरज आहे. भारताच्या देशांतर्गत पातळीवरील गुंतवणुकीला आर्थिक मर्यादा आहेत. म्हणूनच परदेशी गुंतवणूक गरजेची आहे.

**Read the following Passage and answer the questions. (Q. no. 1 to 5)**

It was during the Kuwait crisis that the term 'New World Order' was used to describe the nature of world order. After the disintegration of the Soviet Union two terms came to be used: 'post-Soviet world order' and 'post-cold war era'. All these terms described the political and security situation that evolved after 1991. In the early 1990s another term started to be used. The term was 'globalisation'. Unlike the earlier terms the term globalisation was broader based. It included the nature of economic, ideological, political, technological, social and cultural changes that took place in the world after 1991. Today we use the term globalisation to describe the post-cold war era.

When we talk of globalisation, we say that the world has become more interconnected. Technological developments have helped this interconnectivity. For example, online applications can be made for admission to any college or university abroad. Similarly, mobile calls or WhatsApp messages can be made from any part of the world to your friends and family. Changes have taken place in economics and trade. Indian fruits and flowers are exported to Europe and America, various consumer goods from Europe, America or China are available in the Indian market.

Globalisation increased interconnectedness among countries and people and events in one part of the world have an impact on other parts. There are various ways of looking at this change. One argument is that while interconnectedness has increased, the importance of the state structure has not declined. In fact, the concept of nationalism is still very much alive. Some feel that economics and technology are key factors that have brought the world together. They argue that the concept of sovereignty and jurisdiction of states is now being challenged. There are others who give importance to the civil society and non-state actors. According to them social movements cut across state boundaries and focus on humanitarian problems of the people.

Investment is an important aspect of the economic system. Industries need finance. Investments help to build industries as they provide finance. Investments are done by both, the government and the private sector. Today you may have read about how Indian companies are investing in foreign countries. Private companies like Tatas, Reliance, etc have invested not only in India but in various industries in America, Europe, Africa and other places. Even government companies like ONGC have made investments abroad. Similarly, a lot of foreign companies are investing in India. These investments take place in both infrastructural sector and consumer sector. Foreign companies have invested in building airports, nuclear power plants, etc. in India. They have also invested in consumer food chains like MacDonald's, Burger King, Pizza Hut, etc.

Prior to the 1990s such investments were rare. There used to be several governmental rules that made investments difficult. This has now changed. This change is looked at as free flow of financial capital. This capital flows both ways, from India to foreign Tata's Jaguar Land Rover in UK ONGC Videsh Ltd, Vietnam Microsoft in India Nestlé in India Examples of Foreign investments in India countries and from foreign companies into India. India is a developing country; it needs financial investment in industry for its development. There are limitations to domestic financial investment in India. Therefore, foreign investment is always welcome.

**1.** खालीलपैकी कोणते शब्दप्रयोग 1991 नंतरच्या राजकीय आणि सुरक्षाविषयक व्यवस्थेचे वर्णन करण्यासाठी वापरले गेले?

(अ) नवीन जागतिक व्यवस्था
(ब) जागतिकीकरण
(क) सोव्हिएत रशियानंतरचे युग
(ड) शीतयुद्धोत्तर कालखंड

पर्याय

(1) अ, ब, क
(2) अ, क, ड
(3) क, ड
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following terms described the political and security situation after 1991?

a) New world order
b) Globalisation
c) Post Soviet world order
d) Post cold war era

options:

1) a, b, c
2) a, c, d
3) c, d
4) all of the above

---

**2.** लेखकाच्या मते जागतिकीकरणाचे काय परिणाम झाले आहेत?

(अ) राष्ट्र आणि राष्ट्रातील लोक एकमेकांशी जोडले गेले.
(ब) 'राज्य' व्यवस्थेचे महत्त्व कमी झाले.
(क) राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान निर्माण झाले.

पर्याय

(1) फक्त अ
(2) अ, क
(3) ब, क
(4) वरीलपैकी सर्व

What are the effects of globalisation according to the author?

(a) It increased interconnectedness among countries and people.
(b) It declined the importance of the 'state'.
(c) It challenged the sovereignty of the state.

Options:

(1) only a
(2) a, c
(3) b, c
(4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

3. खालीलपैकी अयोग्य विधान/नेओळखा.

(अ) भारतातून फुले आणि फळे युरोप, अमेरिका आणि आफ्रिकेत निर्यात केले जातात.

(ब) भारतीय कंपन्या युरोप, अमेरिका आणि आफ्रिकेत गुंतवणूक करतात.

(क) भारतीय कंपन्या परदेशात केवळ पायाभूत सुविधांमध्दे गुंतवणूक करतात.

पर्याय :

(1) अ, ब (2) ब, क

(3) अ, क (4) वरीलपैकी सर्व

Which of the following statement/s is/are incorrect?

(a) India exports fruits and flowers to Europe, America and Africa.

(b) Indian companies invest in Europe, America and Africa.

(c) Investment in foreign countries by Indian companies is only in infrastructure sector.

Options:

(1) a, b (2) b, c

(3) a, c (4) all of the above

---

4. जागतिकीकरण या व्यापक शब्द प्रयोगात कोणत्या घटकांचा समावेश होतो?

(अ) सामाजिक (ब) सांस्कृतिक

(क) सुरक्षा (ड) आर्थिक

(इ) तंत्रज्ञान

पर्याय :

(1) अ, ब, क, ड (2) अ, ब, ड

(3) अ, ब, ड, इ (4) वरीलपैकी सर्व

Globalisation, a broader term, includes which of the following factors?

(a) Social (b) Cultural

(c) Security (d) Economic

(e) Technology

चाणक्य मंडल परिवार

Options:

(1) a, b, c, d
(2) a, b, d
(3) a, b, d, e
(4) all of the above

---

**5.** भारताला परदेशी गुंतवणुकीची गरज का आहे?

(अ) भारताचा विकास साधण्यासाठी.

(ब) भारताच्या देशांतर्गत पातळीवरील गुंतवणुकीला मर्यादा आहेत.

(क) भारतीय खासगी कंपन्या भारतात गुंतवणून न करता परदेशात गुंतवणूक करतात.

(ड) भारतीय तंत्रज्ञान अजून विकसनशील अवस्थेत आहे.

पर्याय:

(1) अ, ब
(2) अ, ब, क
(3) अ, ब, ड
(4) वरीलपैकी सर्व

Why India needs foreign investment?

(a) For the development of India.

(b) There are limitations to domestic investment in India.

(c) Indian private companies are investing in foreign countries instead of India.

(d) Technology in India is still in a developing stage.

Options:

(1) a, b
(2) a, b, c
(3) a, b, d
(4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (प्र. क्र. 6 ते 10)**

पर्यावरण म्हणजे काय? पर्यावरण म्हणजे आपल्या अवतीभोवती असणारे वातावरण, आपण ज्यामुळे श्वास घेतो ती हवा, पृथ्वीचा बहुतांश भाग व्यापणारे पाणी, प्राणी इत्यादी. पर्यावरण म्हणजे ज्या वातावरणामध्ये माणूस, प्राणी आणि वनस्पती राहतात. नैसर्गिकरीत्या आढळणाऱ्या सर्व सजीव आणि निर्जीव गोष्टी मिळून नैसर्गिक पर्यावरण बनते. यामध्ये माती, हवा, पाणी, खडक, हवामान इत्यादींचा समावेश केला जातो. मानवनिर्मित पर्यावरण हा सुद्धा पर्यावरणाचाच भाग समजला जातो म्हणजेच असे भूप्रदेश ज्याचे परिवर्तन माणसाने शहरी भागांमध्ये किंवा शेतीसाठी केलेले आहे. नैसर्गिक पर्यावरणाचे रुपांतर मानवी पर्यावरणामध्ये केलेले आहे.

1972 साली स्टॉक होम येथे संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरण विषयक परिषदेत पहिल्यांदाच आर्थिक विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांच्यातील संबंधांचा विचार आंतरराष्ट्रीय स्तरावर केला गेला. या परिषदेचा मुख्य हेतू मानवी पर्यावरणाचे संरक्षण आणि त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी देशांना प्रोत्साहन देणे आणि मार्गदर्शन करणे असा होता. 1983 साली संयुक्त राष्ट्राने जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगाची स्थापना केली. (ब्रंटलँडकमिशन) या आयोगाने 1987 साली आपला अहवाल सादर केला. या अहवालामध्ये केवळ आर्थिक वाढीचा नाही तर शाश्वत विकासाचा पर्यायी दृष्टिकोन मांडण्यात आला.

संयुक्त राष्ट्रांच्या आम सभेने संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण आणि विकास परिषद बोलावली. ही परिषद ब्रंटलँड कमिशनच्या अहवालाचा आढावा घेणारी होती. या परिषदेचा हेतू सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणणारी तसेच पर्यावरणाचा ऱ्हास रोखणारी विकासाची संकल्पना समजून घेण्याचा होता. त्याचबरोबर विकसनशील राष्ट्रे आणि औद्योगिक प्रगत राष्ट्रे यांच्या एकत्रित प्रयत्नांतून पृथ्वीचे सुदृढ भवितव्य साधणे हेदेखील या परिषदेचे उद्दिष्ट होते. ही परिषद 1992 साली रिओ येथे झाली.

रिओ द जेनेरीओ अर्थ समिट, रिओसमिट, (1992) रिओ कॉन्फरन्स किंवा अर्थ समिट अशी या परिषदेची विविध नावे आहेत. यापरिषदेने विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्याचा तसेच पर्यावरण आणि विकास यांचा एकत्रितपणे विचार करण्यासाठी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. शासन, उद्योग आणि स्वयंसेवी संस्थांचे नेते 2002 साली जोहान्सबर्ग येथे अर्थ समिटसाठी एकत्र आले. राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांसाठी शाश्वत विकास हे सर्वांत महत्त्वाचे ध्येय आहे. हे ठरले गेले. 2012 मध्ये रिओ येथे संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकासा संदर्भात पुन्हा एकदा परिषद घेतली गेली. त्याला रिओ + 20 किंवा रिओ अर्थ समिट 2012 असे संबोधले जाते.

पर्यावरणीय शाश्वततेचा उद्देश नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे, ऊर्जेचे पर्यायी स्रोत शोधून काढणे, प्रदूषण आणि पर्यावरणाला पोहचणारी हानी कमी करणे हा आहे. पर्यावरणीय संसाधनांची हानी रोखण्यासाठी पर्यावरणासोबत जबाबदार नाते निर्माण करणे व दीर्घ काळासाठी पर्यावरणीय गुणवत्ता राखणे ही पर्यावरण शाश्वततेची व्याख्या आहे. पर्यावरणीय शाश्वततेचा उद्देश हा आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना पुढील पिढीच्या गरजा भागवण्याच्या क्षमतेशी तडजोड न करणे हा आहे.



चाणक्य मंडल परिवार

**Read the following Passage and answer the questions. (Q. no. 6 to 10)**

What is the environment? It is everything that makes up our surroundings, the air we breathe, the water that covers most of the earth's surface, the plants and animals around us, and much more. It is the conditions in which a person, animal, or plant lives. The natural environment consists of all living and non-living things occurring naturally. It would include soil, rocks, atmosphere, air, water, and climate, etc. There is also the manmade environment. It is considered as the part of the environment. This refers to such areas where man has transformed landscapes such as urban settings and agricultural land conversion. The natural environment is modified into a human environment.

The relationship between economic development and environmental degradation was first placed on the international agenda in 1972, at the United Nations (UN) Conference on the Human Environment, held in Stockholm. The main purpose of the conference was to encourage and provide guidelines for the protection and improvement of human environment. In 1983 the UN set up the World Commission on Environment and Development (Brundtland Commission). The Report of the Commission (1987) put forward the concept of sustainable development as an alternative approach to one based on economic growth.

The UN General Assembly called for the UN Conference on Environment and Development (UNCED) as a follow up to the report of the Brundtland Commission. The goal of the summit was to understand the concept of development that would support socio-economic development and prevent the continued deterioration of the environment. It also aimed at creating a partnership between the developing and the more industrialised countries to ensure a healthy future for the planet. This summit was held at Rio in 1992.

The Rio de Janeiro Earth Summit (1992) also called the Rio Summit, the Rio Conference, or the Earth Summit sought to create international cooperation on development issues. It tried to raise public awareness on the need to integrate environment and development. In 2002 the Earth Summit was held in Johannesburg with the goal of again bringing together leaders from government, business and NGOs. Sustainable Development was recognised as the most important goal for institutions at the national, regional and international levels. In 2012, the United Nations Conference on Sustainable Development was again held in Rio, and is also commonly called Rio+20 or Rio Earth Summit 2012.

The goal of environmental sustainability is to conserve natural resources and to develop alternate sources of power while reducing pollution and harm to the environment. Environmental sustainability is defined as responsible interaction with the environment to avoid depletion or degradation of natural resources and allow for long-term environmental quality. The practice of environmental sustainability helps to ensure that the needs of today's population are met without jeopardizing the ability of future generations to meet their needs.



चाणक्य मंडल परिवार

**6.** सर्व सजीव व निर्जीव गोष्टींचा समावेश पर्यावरणामध्ये होतो परंतु मनुष्याने शहरी भागात किंवा शेतीसाठी परिवर्तीत केलेल्या प्रदेशांचा समावेश पर्यावर्णात होत नाही. हे वाक्य-

(1) पूर्ण सत्य आहे
(2) पूर्ण असत्य आहे
(3) अर्ध सत्य आहे
(4) वरीलपैकी एकही नाही

The environment consists of all living and non-living things but it does not include the urban setting and agricultural land transformed by man. This statement is-

(1) Completely true
(2) Completely false
(3) Partially true
(4) None of the above

---

**7.** 1992 साली भरलेल्या रिओ परिषदेचा हेतु खालीलपैकी कोणता होता?

(अ) विकसनशील राष्ट्रे आणि औद्योगिक प्रगत राष्ट्रे यांच्या एकत्रित प्रयत्नातून पृथ्वीचे भवितव्य सुदृढ करणे.

(ब) मानवी पर्यावरणाचे संरक्षण आणि त्यात सुधारणा करण्यासाठी देशांना प्रोत्साहन देणे.

(क) नैसर्गिक संसाधानांचे संरक्षण करणे.

(ड) पर्यावरणाचा ऱ्हास रोखणारी आणि सामाजिक आर्थिक विकास घडवून आणणारी विकासाची संकल्पना समजून घेणे.

पर्याय:

(1) अ, ब
(2) अ, ब, ड
(3) अ, ड
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following was the goal of Rio summit held in 1992?

(a) Creating a partnership between the developing and more industrialised countries to ensure the healthy future for the planet.

(b) To encourage the protection and improvement of human environment.

(c) To conserve the natural resources.

(d) To understand the concept of development for socio-economic development and to prevent deterioration of the environment.

Options:

(1) a, b
(2) a, b, d
(3) a, d
(4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

**8.** खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(अ) आर्थिक विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांच्यातील संबंधाचा विचार प्रथम ब्रंटलँडक मिशनने आपल्या अहवालामध्ये केला.

(ब) या अहवालानुसार आर्थिक विकासाच्या ऐवजी शाश्वत विकासाचा पर्यायी दृष्टिकोण मांडण्यात आला.

(क) या अहवालानुसार शाश्वत विकास म्हणजे आजच्या पिढ्यांच्या गरजा पूर्ण करताना पुढील पिढ्यांच्या गरजा भागवण्याच्या क्षमतेची तडजोड न करणे.

पर्याय:

(1) अ, ब
(2) फक्त ब
(3) अ, ब, क
(4) यापैकी नाही

Identify the correct statement/s from below.

(a) The relationship between economic development and environmental degradation was first placed by Brundland commission in their report.

(b) The report put forward the concept of sustainable development as an alternative to economic development.

(c) According to this report the sustainable development is to ensure that the needs of today's population are met without jeopardizing the ability of future generations to meet their needs.

Options:

(1) a, b
(2) only b
(3) a, b, c
(4) none of the above

---

**9.** परिच्छेदास योग्य शीर्षक सुचवा.

(1) नैसर्गिक आणि मानवी पर्यावरण
(2) पर्यावरणाचे रक्षण
(3) शाश्वत विकास
(4) पर्यावरणीय शाश्वतता आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन

Suggest a suitable title for the passage.

(1) Natural and human environment
(2) Environment protection
(3) Sustainable development
(4) Environmental sustainability and environmental impact assessment.



चाणक्य मंडल परिवार

**10.** खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(अ) शाश्वत विकास उद्दिष्टेही विकसनशील आणि विकसित राष्ट्रांना लागू आहेत.

(ब) शाश्वत विकासाचे ध्येय गाठण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याची गरज आहे.

पर्याय :

(1) फक्त अ

(2) फक्त ब

(3) दोन्ही बरोबर

(4) वरीलपैकी नाही

Which of the following statement/s is/are correct?

(a) Sustainable development goals are applicable to developing and developed nations.

(b) International laws are necessary to achieve the sustainable development goals.

Options:

(1) Only a

(2) Only b

(3) Both a and b

(4) None of the above

चाणक्य मंडल परिवार

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (प्र. क्र. 11 ते 15)**

या जगाचे निरीक्षण करताना एका टप्प्यावर माणसाच्या असे लक्षात आले, की जगात घडणाऱ्या घटना कशाही घडत नाहीत. त्यांचा एकमेकांशी संबंध असतो, त्या विशिष्ट क्रमाने घडतात, उदाहरणार्थ, आपण ज्या हवामानात राहतो तिथे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतू याच क्रमाने येत असतात. पाणी आग विझवू शकते, तर उन्हाने पाण्याची वाफ होते. यामधून त्याच्या असे लक्षात आले, की या जगात एक प्रकारची व्यवस्था आहे. कशामधून काय निर्माण होते, कसे निर्माण होते, याचे नियम आहेत. माणसांच्या जगात असलेले नियम कोणीतरी, म्हणजे कुठल्या तरी माणसांनीच, तयार केलेले असतात. साहजिकच काही विचारवंतांना वाटले की, निसर्गात जे नियम, जी व्यवस्था दिसते तीदेखील कुणीतरी निर्माण केलेली असणार.

कदाचित हे सगळे विश्वच कोणीतरी निर्माण केले आहे. यासाठी लागणारी शक्ती अर्थातच प्रचंड, खरे तर अमर्याद असायला हवी. अशांसारख्या कल्पनांमधून 'ईश्वर' संकल्पना साकार व्हायला लागली. ईश्वराचा आणि मानवाचा संबंध काय आहे, काय असायला हवा याविषयीच्या विचारांनी धर्मचिंतनाचा पाया घातला. या प्रकारच्या चिंतनात कल्पने बरोबरच बुध्दीचा उपयोग केला गेला. सहसा या दोन्हींच्या जोडीला धर्म चिंतनात श्रद्धेवर खूप भर दिला गेला. या दृश्य जगापलीकडची पारलौकिक शक्ती आणि त्या शक्तीचे स्वरूप ज्यांना समजले आहे, अशा अलौकिक व्यक्तींवर आणि त्यांच्या शब्दांवर श्रद्धा ठेवण्याची आवश्यकता धर्मांनी सांगितली.

जगाबद्दल माणसाला जे समजत होते, जाणवत होते ते त्याच्या जगण्यात वेगवेगळ्या पद्धतींनी व्यक्त होत होते. जगातील वस्तू, घटना यांचे गुणधर्म, एकमेकांशी असलेले संबंध यांबरोबरच माणसाला त्यांच्या मध्ये सौंदर्य सुद्धा जाणवत होते. ते सौंदर्य त्याला मोहित करत होते आणि सौंदर्याची निर्मिती करण्याची प्रेरणाही देत होते. यातूनच माणसाने संगीत, चित्र, नृत्य अशा अनेक कला विकसित केल्या.

कलेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही व्यावहारिक उपयोगाचा विचारही न करता कलेमधून मिळणाऱ्या आनंदात आपण रममाण होऊ शकतो. कलाकृती निर्माण करणारा आणि त्याचा आस्वाद घेणारा या दोघांनाही कलेतून आनंद मिळतो. कलाविष्कारामध्ये कल्पना, बुद्धी यांप्रमाणेच सृजन शक्तीची आवश्यकता असते.

विश्वाबद्दलच्या आपल्या औत्सुक्यातून जन्म घेतलेल्या प्रश्नांना माणसाने दिलेल्या प्रतिसादांपैकी तिन्हींमध्ये बुध्दीला स्थान असते हे खरेच, पण या प्रश्नांना तत्त्वज्ञान आणि विज्ञान जी उत्तरे देतात, त्यांचा मात्र बुध्दी हाच खऱ्या अर्थाने पाया असतो. याचा अर्थ असा नाही की, यांमध्ये कल्पना शक्तीला वावच नसतो. ज्या काळात निरीक्षणे आणि प्रयोग यांना खूप मर्यादा होत्या, त्याकाळात कल्पनेच्या बळावरच अनेक उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न चिंतकांनी केला. मात्र या कल्पनेवर बुद्धीचा अंकुश होता. तर्काच्या आधारावर टिकू शकणाऱ्या कल्पनांनाच तत्त्व चिंतनात स्थान मिळाले. या जगात घडणाऱ्या घटनांना दुसऱ्या कुठल्या जगातील नव्हे, तर याच जगातल्या घटना कारणीभूत आहेत, हे लक्षात यायला लागले.

**Read the following Passage and answer the questions. (Q. no. 11 to 15)**

As humans went on to observe the world, they realized that things do not randomly occur. They are related to one another. They often have a fixed sequence. For example: in our type of climatic conditions; summer, monsoon and winter always arrive in the same order; water extinguishes fire but evaporates when heated. Thus they sensed that there is an order in the world. The what and how of existence of things is governed by certain laws. In the human world it is humans who lay out the laws. Philosophers assumed that there must be someone who lays out the laws, the system of the natural world too.

Perhaps the universe has been created by someone. The power it took to create the universe must be tremendous, rather infinite. These postulations gradually led us to the idea of 'God'. Ideas concerning human beings possible, fitting relationship to God laid the foundation of religious thinking. Intellect was equally engaged along with imagination in this discourse. Normally religious thinking put a lot of emphasis on faith. One was asked to have faith in the otherworldly, supernatural power and in persons who were said to possess knowledge of the nature of that power.

All that humans sensed or understood about the world found expression in manifold ways. They also perceived beauty in worldly objects and events apart from their properties, co-relations. The beauty fascinated them and inspired them to create beauty in response. From this emerged music, dance, painting and several other art practices.

Art offers us the opportunity to indulge in life without being occupied with utility or profitability. It delights both the creator and the appreciator. Along with the intellect and imagination, creativity is essential for art.

Intellect is one of the faculties involved in the three aforementioned answers to questions arising out of man's curiosity about the world. But the answers provided by Philosophy and Science are entirely based on human intellect. That does not mean imagination is thrown out of the window here. Many thinkers used their imagination to find answers in the times when observation and experimentation were severely limited. But here imagination was regulated by intellect. Only the imaginations that stood the test of reason retained themselves in philosophical thinking. One realized that events taking place in this world aren't caused by otherworldly forces but by other events in this world itself.

**11.** लेखकाच्या मते जगाचे निरीक्षण करताना मानवाच्या काय लक्षात आले?

(अ) घडणाऱ्या घटनांचा एकमेकांशी संबंध असतो.

(ब) घटना या विशिष्ट क्रमाने घडत असतात.

(क) माणसांच्या जगात असलेले नियम हे माणसांनी तयार केलेल असतात.

(ड) निसर्गातील नियम हे माणसांनीच तयार केलेल असतात.

पर्याय:

(1) अ, ब (2) अ, ब, क

(3) अ, ब, ड (4) वरीलपैकी सर्व

According to the author what did the human realize after observing the world?

(a) Things are related to one another.

(b) Things often have a fixed sequence.

(c) Humans have laid out the rules in the human world.

(d) Laws of nature are laid out by the humans.

Options:

(1) a, b (2) a, b, c

(3) a, b, d (4) all of the above

---

**12.** खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(अ) धर्म चिंतनात कल्पने बरोबरच बुद्धीचा उपयोग केला जातो.

(ब) धर्म चिंतनात श्रद्धेवर खूप भर देण्यात आला.

(क) विश्व निर्माण करणारी ती प्रचंड व अमर्याद शक्ती कोणती याविषयीच्या विचारांनी धर्म चिंतनाचा पाया घातला.

पर्याय:

(1) फक्त अ (2) अ, ब

(3) फक्त क (4) वरीलपैकी सर्व

Identify correct statement/s from below.

(a) Intellect was equally engaged along with imagination in religious thinking.

(b) Religious thinking put a lot of emphasis on faith.

(c) The foundation of religious thinking was laid down by the study of tremendous and infinite power which created the world.

Options:

(1) Only a (2) a, b

(3) only c (4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

**13.** खालीलपैकी काय माणसाला कला विकसित करण्याची प्रेरणा देत होते?

(अ) ईश्वर ही संकल्पना

(ब) जगातील वस्तु व घटना

(क) मानवाची कल्पना व बुद्धी

पर्याय:

(1) अ, ब (2) फक्त ब

(3) ब, क (4) अ, ब, क

Which of the following inspired humans to develop the art?

(a) The concept of God

(b) Worldly objects and events

(c) Human intellect and imagination

Options:

(1) a, b (2) only b

(3) b, c (4) a, b, c

---

**14.** कोणावर श्रद्धा ठेवण्याची आवश्यकता धर्माने सांगितली?

(1) ईश्वरावर (2) पारलौकिक शक्तीवर

(3) धर्म चिंतनावर (4) व्यक्तींवर

According to the religion, in whom we should have faith?

(1) On God (2) Supernatural powers

(3) Religious thinking (4) Humans

---

**15.** खालीलपैकी अयोग्य नसलेले विधान/ने ओळखा.

(अ) तत्वज्ञान आणि विज्ञान यात बुद्धी हाच खरा पाया असतो. त्यात कल्पना शक्तीला वाव नसतो.

(ब) कल्पनांना तत्व चिंतनात स्थान मिळण्यासाठी तत्वाचा आधार गरजेचा असतो.

पर्याय:

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) अ, ब दोन्ही (4) वरीलपैकी नाही

Identify the statement/s from below which is/are not incorrect.

(a) by Philosophy and Science are entirely based on human intellect.There is no scope for imagination.

(b) To retain in philosophical thinking, imaginations should have the support of reason.

Options:

(1) Only a (2) Only b

(3) Both a and b (4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (प्र. क्र. 16 ते 20)**

तत्त्वज्ञाना पुढचा प्रश्न असा होता, की अशी किती द्रव्ये अस्तित्वात आहेत? जी आहेत ती काही मूलभूत द्रव्यांपासून निर्माण होतात का? ती मूलभूत द्रव्ये कोणती? ती किती आहेत? आपल्या परंपरेतील पंचमहाभूतांची कल्पना तुम्हांला माहितीच असेल. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश यांना पंचमहाभूते मानले जाते. याचे कारण असे, की याच पाच मूलतत्त्वांच्या किंवा द्रव्यांच्या वेगवेगळ्या प्रमाणात होणाऱ्या मिश्रणातून सर्वभौतिक जग आकाराला येते अशी तेव्हा समजूत होती. आस्तिक दर्शनांनी पंचमहाभूतांची कल्पना स्वीकारली होती. चार्वाकांनी आकाश सोडून इतर चार तत्त्वे मान्य केली. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ एम्पिडोक्लिस याने ही पृथ्वी, जल, अग्नि, वायू यांनाच महाभूते मानले.

आज आपल्याला हे ठाऊक आहे, की या पाच किंवा चार महाभूतांना मूलद्रव्ये मानता येणार नाही, कारण वैज्ञानिक विश्लेषणातून ही द्रव्ये कशापासून उत्पन्न होतात हे आपल्याला कळले आहे. हायड्रोजनचे दोन अणू आणि ऑक्सिजनचा एक अणू मिळून पाण्याचा रेणू तयार होतो, म्हणून पाणी हे मूलद्रव्य असू शकत नाही. याचा अर्थ तत्त्वज्ञानाने मूलद्रव्यांचा वेध घेण्याचा जो प्रयत्न केला तो चुकीचा होता असा मात्र होत नाही. कारण 'मूलद्रव्य' ही संकल्पना चुकीची नाही. विज्ञानपूर्व काळात, केवळ बुद्धिच्या आणि सामान्य निरीक्षणांच्या बळावर मूलद्रव्यांची संख्या किती या प्रश्नाचे अचूक उत्तर देणे शक्य नव्हते. पण हा प्रश्न तत्त्वज्ञानाने उपस्थित केल्यामुळे विज्ञानाची वाटचाल त्या दिशेने होऊन उत्तरे सापडली हे विसरता येणार नाही.

तार्किक दृष्टीने पाहिले, तर 'विश्वाच्या मुळाशी किती घटक आहेत'? या प्रश्नाचे उत्तर एक, दोन किंवा अनेक यांपैकीच एक असू शकते, हे स्पष्टच आहे. त्यामुळेच वेगवेगळ्या तत्त्वज्ञांनी किंवा तत्त्वप्रणालींनी दिलेल्या उत्तरांचे वर्गीकरण एक तत्त्ववाद, द्वितत्त्ववाद, अनेकतत्त्ववाद या प्रकारांमध्ये करता येते. त्याचप्रमाणे या घटकांचे स्वरूप काय आहे या प्रश्नाच्या संभाव्य उत्तरांचेही ठराविक प्रकारात विभाजन करता येते. अस्तित्वात असलेल्या सगळ्या वस्तूंची सजीव आणि निर्जीव अशी वर्गवारी करता येते. निर्जीव वस्तू भौतिक, जड असतात तर सजीवांमध्ये जडाबरोबरच चैतन्याचे अस्तित्वही असते. साहजिकच, अंतिम सत्ता मुळात जडरूप आहे किंवा चैतन्यरूप आहे किंवा जड आणि चेतन हे दोन्ही अंतिम सत्य आहेत असे पर्याय तार्किकदृष्ट्या संभवतात. त्यामधून जडवाद, चिद्वाद आणि वास्तववाद असे तीन वेगवेगळे सिद्धांत निष्पन्न होतात. वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये तत्त्व चिंतन काहीसे बदलत असले, तरी त्यामध्ये विचारले जाणारे प्रश्न बरेचसे एकसारखे असतात. त्यांच्या उत्तरांचे तेच पर्याय वेगवेगळ्या परंपरांनुसार वैशिष्ट्यपूर्ण रूपात पुढे येतात.

भारतीय परंपरेत आस्तिक आणि नास्तिक, दोन्ही प्रकारच्या दर्शनांमध्ये अंतिम सत्याच्या संख्येबद्दल आणि स्वरूपाबद्दलचे चिंतन आढळते. बहुसंख्य दर्शने अनेक तत्त्ववाद मान्य करतात. यांमध्ये चार्वाक, जैन, मीमांसा, न्याय, वैशेषिक यांचा प्रामुख्याने समावेश होतो. मात्र, अंतिम सत्तेच्या स्वरूपाबद्दल त्यांच्यामध्ये काही मतभेद आहेत. प्रमुख दर्शनांमध्ये जडवाद स्वीकारणारे चार्वाक हे एकमेव दर्शन आहे. विश्वाचे मूळ स्वरूप जड म्हणजे अचेतन, भौतिक स्वरूपाचे आहे आणि त्या जडामधूनच चैतन्याची उत्पत्ती होते असे जडवाद सांगतो. जडवादी हे सहसा अनेक तत्त्ववादी असतात असे तत्त्वज्ञानाचा इतिहास सांगतो. म्हणजेच त्यांच्यामते अंतिम सत्याच्या संख्या दोनपेक्षा अधिक असते. मात्र, अंतिम तत्त्वांची संख्या कितीही असली, तरी अंतिम तत्त्व जड स्वरूपाचेच असते, असे हे सिद्धांत मानतात.

**Read the following Passage and answer the questions. (Q. no. 16 to 20)**

The philosophers wondered about various questions such as: what could be the number of these substances that exist? Are the ones that exist, created from some fundamental substances? What are these basic elements? How many are they in number? You are all aware of the five basic elements discussed in Indian tradition. Earth, water, fire, air and ether are said to be the five basic elements. That is because, it was believed that the material world is formed out of the various combinations of the five basic elements in different proportions. Except Charavaka, all other prominent Indian schools of philosophy had accepted the notion of five basic elements (panchamahabhuta). The Charavakas admit the existence of four basic elements (earth, water, fire, air) while they rejected ether. Even the ancient Greek philosopher Empedocles considered only earth, water, fire and air as the basic elements.

Today, we are aware that these five or four elements cannot be regarded as the basic elements. It is through scientific analysis, we have learnt how these elements originate. It is the combination of two atoms of hydrogen and one atom of oxygen that form a molecule of water, hence, water cannot be the basic element. However, this does not mean that the philosophical attempts made in search of the basic elements were mistaken. The notion of 'basic element' is not incorrect. In the prescientific period, it was difficult to find the exact number of the basic elements merely on the basis of reason and general observations. Nevertheless, it should be noted that this question discussed in philosophy paved the way for the scientific research in this direction.

Logically speaking, the question 'how many fundamental elements are there in the universe'? can be obviously answered as one, two or many. Therefore, the answers given by different philosophers or philosophical systems can be categorized into monism, dualism and pluralism. Similarly, the possible answers to these questions regarding the nature of the elements can be specifically classified. Everything that exists can be classified into living and non-living (animate and inanimate). Inanimate objects are physical and material whereas in living beings we find consciousness existing alongwith the matter. Accordingly; we get specific logical possibilities, either the ultimate reality is material or spiritual or it is both material and spiritual. Consequently, three different theories are formed: materialism, idealism and realism. The philosophical contemplations in different traditions may slightly vary, but the questions posed by them often remain the same. It is seen that the similar responses are put forth in unique ways by different traditions.

In Indian tradition, both the orthodox and heterodox schools of philosophy have reflected upon the number and nature of the ultimate reality. Majority of the darshanas acknowledge pluralism. These mainly include Charvaka, Jaina, Mimamsa, Nyaya and Vaisesika. However, they have some

differences regarding the nature of the ultimate reality. Of all the main darshanas, Charvaka is the only darshana that has accepted materialism. Materialism states that the fundamental nature of the universe is material; that means it is non-conscious and physical. It also states that the consciousness is a by-product of matter. In the history of philosophy it is observed that the materialists are often pluralists. It implies that the number of the ultimate reality is more than two. Nonetheless, the theory believes that the fundamental principles are material, no matter what their number is.

**16.** खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.
(अ) भारतातील सर्व दर्शनानी पंचमहाभूतांची कल्पना स्वीकारली.
(ब) प्राचीन ग्रीक तत्वज्ञानी चार महाभूते स्वीकारली.
पर्याय:
(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) अ, ब दोन्ही (4) वरीलपैकी एकही नाही

Identify the correct statement/s from below.
(a) All Indian philosophies accepted the five basic elements.
(b) Ancient Greek philosophers accepted four basic elements.
Options:
(1) Only a (2) Only b
(3) Both a and b (4) None of the above

---

**17.** वैज्ञानिक विश्लेषणातून आपल्याला काय लक्षात आले?
(अ) महाभूतांना मूलद्रव्ये मानता येणार नाहीत.
(ब) पाणी हे मूलद्रव्य असू शकत नाही.
(क) तत्वज्ञानाने मूलद्रव्यांचा वेध घ्यायचा जो प्रयत्न केला तो चुकीचा नव्हता.
पर्याय:
(1) अ, ब (2) ब, क
(3) अ, क (4) वरीलपैकी सर्व

What we learnt from scientific analysis?
(a) The five elements can not be considered as basic elements.
(b) Water can not be a basic element.
(c) The philosophical attempts made in search of the basic elements were not mistaken.
Options:
(1) a, b (2) b, c
(3) a, c (4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

**18.** अंतिम सत्य कसे आहे?

(1) जडरूप किंवा चैतन्यरूप
(2) जडरूप आणि चैतन्यरूप
(3) 1 आणि 2
(4) वरीलपैकी नाही

How the ultimate reality is?

(1) Material or spiritual
(2) Material and spiritual
(3) 1 and 2
(4) None of the above

---

**19.** खालीलपैकी अयोग्य नसलेले विधान/ने ओळखा.

(अ) आस्तिक आणि नास्तिक यादोन्ही प्रकारच्या दर्शनामध्ये अंतिम सत्याच्या संख्येबद्दल आणि स्वरूपा बद्दल मतभेद आढळतात.
(ब) सर्व दर्शनामध्ये जडवाद स्वीकारणारे चार्वाक हे एकमेव दर्शन आहे.
(क) जडवादी हे अनेक तत्ववादीच असतात.

पर्याय:

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, क
(4) वरीलपैकी एकही नाही

Identify the statement/s which is/are not incorrect.

(a) both the orthodox and heterodox schools of philosophy have differences about the number and nature of the ultimate reality.
(b) Of all the philosophies, Charvaka is the only philosophy that has accepted materialism.
(c) materialists are always pluralists.

Options:

(1) a, b
(2) b, c
(3) a, c
(4) none of the above

---

**20.** चर्वाकांच्यामते –

(अ) विश्वाचे मूलस्वरूप हे अचेतन व भौतिक आहे.
(ब) जडामधूनच चैतन्याची उत्पत्ति होते.
(क) अंतिम सत्य एक असू शकत नाही.

पर्याय:

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, क
(4) वरीलपैकी सर्व

According to Charvaka –

(a) Fundamental nature of the world is non-conscious and physical.
(b) Consciousness is the by-product of matter.
(c) There can not be a single ultimate truth.

Options:

(1) a, b
(2) b, c
(3) a, c
(4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या. (प्र. क्र. 21 ते 25)**

आणीबाणीच्या काळात संसदेने घटनादुरुस्त्यांमधील सर्वात वादग्रस्त व क्रांतिकारी अशी घटनादुरुस्ती संमत केली - ती म्हणजे 42वी घटनादुरुस्ती (1976). घटनेची वाढ होण्यामध्ये जे अडथळे येतील, ते नष्ट करण्यासाठी ही घटनादुरुस्ती केली गेली. या घटनादुरुस्तीने केलेल्या दूरगामी - ठोस व प्रतिकात्मक - बदलांमुळे मूळ घटनेचे रूप अक्षरश: पालटून गेले. या बदलांपैकी काही बदल असे होते : एक म्हणजे भाग 4 ए चा घटनेमध्ये केला गेलेला अंतर्भाव. या भागात नागरिकांची मूलभूत कर्तव्ये सांगितली आहेत. तसेच यात भाग 4 खालील राज्यधोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यासाठी जे कायदे तयार करण्यात येतील, त्या कायद्यांचे संरक्षण, घटनेच्या प्रास्ताविकात समाजवादी व धर्मनिरपेक्ष या संज्ञांचा अंतर्भाव, संसदेचा घटनादुरुस्तीचा अधिकार मर्यादित असेल व घटनादुरुस्तीच्या नावाखाली घटनेच्या मूळ आराखड्याला संसदेला धक्का लावता येणार नाही या केशवानंद निकालाचा परिणाम शून्य करण्यासाठी अनुच्छेद 368 मध्ये केलेली दुरुस्ती व राज्य सरकारांच्या तुलनेत केंद्र सरकारला अधिक शक्तिशाली करणे. या घटनादुरुस्तीवरून हे स्पष्टपणे कळून येत होते की भारतातील राजकीय परिस्थिती कमालीची डाव्या बाजूला झुकली आहे.

42वी घटनादुरुस्ती अधिनियम संमत झाल्यापासून दोन वर्षांच्या आतच कर्नाटकातील एका कापड गिरणीच्या मालकांनी त्यांच्या उद्योगाच्या शासनाने केलेल्या राष्ट्रीयीकरणाला आव्हान दिले. संसदेने नवव्या अनुसूचीखाली नमूद केलेल्या कायद्याच्या अधीन या गिरणीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. मिनर्व्हा मिल्स वि. युनियन ऑफ इंडिया (मिनर्व्हा मिल्स) या याचिकेत याचिकाकर्त्यांनी 42वी घटनादुरुस्ती अधिनियमाच्या कलम 55च्या वैधतेला आव्हान दिले. कलम 55 मुळे अनुच्छेद 368 ची दुरुस्ती झाली होती व त्यामुळे संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारात बदल झाला व तो अमर्यादित झाला (जो अधिकार केशवानंदने मर्यादित केला होता). सर्वोच्च न्यायालयाने एकमताने अनुच्छेद 368 मध्ये केलेली सुधारणा रद्द ठरवली व असे म्हटले की, न्यायालयीन पुनरावलोकन व घटनादुरुस्तीचा मर्यादित अधिकार ही घटनेची पायाभूत वैशिष्ट्ये आहेत, ज्यांच्यामध्ये, केशवानंदमध्ये म्हटल्याप्रमाणे बदल होऊ शकत नाही, ती नष्ट केली जाऊ शकत नाहीत अगर रद्दबातलही ठरवली जाऊ शकत नाहीत. न्यायालयाचे म्हणणे साध्या तर्कावर आधारलेले होते. जर एखाद्याला अधिकार देताना मर्यादित अधिकार दिला असेल, तर तोच अधिकार वापरून त्याला मर्यादित अधिकाराचे रूपांतर अमर्यादित अधिकारात करता येणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या मिनर्व्हा मिल्समधील निकालाने हे प्रस्थापित केले की मूळ आराखडा तत्त्वातील दृष्टिकोनाप्रमाणे न्यायालयीन पुनरावलोकनाचा किमान दर्जा अबाधित राहील. मिनर्व्हा मिल्स हे शेवटचे न्यायालयीन प्रकरण होते, ज्यात शासनाने घटनेवर संसदीय वर्चस्व मिळवण्याचा नियोजित प्रयत्न केला. 'मूळ आराखड्या'च्या तत्त्वाशी कसलीही तडजोड न करता मिनर्व्हा मिल्सने भारतात न्यायालयीन वर्चस्वाचे युग सुरू केले व घटनेचा अन्वयार्थ लावण्याच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल असे ठामपणे प्रस्थापित केले.

1951 मध्ये नवव्या अनुसूचीचा समावेश घटनेत केल्यापासून एकंदर 284 कायद्यांना या अनुसूचीखाली आणून संरक्षण देण्यात आले. सुरुवातीला जरी फक्त जमीन सुधारणा कायद्याला संरक्षण देणे असा या अनुसूचीचा उद्देश होता, तरी सध्या या अनुसूचीत असे अनेक कायदे आहेत, ज्यांचा जमीन सुधारणांशी फारच कमी संबंध आहे. उदाहरणार्थ, इसेन्शिअल कमोडीटीज ॲक्ट 1955, लेव्ही शुगर प्राईस इक्वलायझेशन फंड ॲक्ट 1976 व बॉण्डेड लेबर सिस्टीम (ॲबॉलिशन) ॲक्ट 1976 हे कायदे.

**Read the following Passage and answer the questions. (Q. no. 21 to 25)**

During the Emergency, the Parliament passed the most controversial and revolutionary of the constitutional amendment - the Constitution Forty-second Amendment, 1976. Enacted to eliminate ‘impediments to the growth of the Constitution' ,the amendment virtually remoulded the original Constitution through sweeping changes - substantive and symbolic - such as : the insertion of Part IVA into the Constitution, which highlighted the 'fundamental duties' of citizens, enabling the protection of any laws that gave effect to the directive principles under Article IV of the Constitution, insertion of the expressions 'socialist' and 'secular' into the Preamble to the Constitution, amendment of Article 368 nullifying the decision in Kesavananda that the Parliament's amending power was subject to the 'basic structure' limitation, and strengthening the position of the Central government vis-à-vis the state governments. This amendment was a manifestation of India's distinct shift to the political left.

Within a couple of years of the Forty-second Amendment Act being passed, the owners of a textile mill in Karnataka challenged the government's nationalization of their undertaking. The mill was nationalized under a statute placed in the Ninth Schedule by the Parliament. In Minerva Mills vs Union of India (Minerva Mills), the petitioners challenged the validity of Section 55 of the Forty-second Amendment Act, which amended Article 368 to transform the Parliament's amending power over the Constitution (which was limited by Kesavananda) into an unlimited one. The Supreme Court unanimously struck down the amendments to Article 368, holding that judicial review and a limited amending power were basic features of the Constitution, which, according to the judgement in Kesavananda, could not be altered, destroyed or nullified. The court's logic was simple - if a donee was vested with limited power, it could not be permitted to exercise that very power and convert it into an unlimited one.

The Supreme Court's judgement in Minerva Mills established that from the perspective of the basic structure doctrine, a minimum standard of judicial review was inviolate. Minerva Mills was the last case in which the government made a concerted effort to establish parliamentary supremacy over the Constitution. Having failed to scale back on the basic structure doctrine, Minerva Mills marks the beginning of an era of judicial supremacy in India, with the Supreme Court firmly entrenched as the final arbiter of constitutional interpretation in India.

Since the insertion of the Ninth Schedule into the Constitution in 1951, 284 statutes have come under its protection. Although it was initially meant to protect land reform legislation, the schedule now contains many statutes that have little to do with land reform - the Essential Commodities Act 1955, the Levy Sugar Price Equalisation Fund Act, 1976 and the Bonded Labour System (Abolition) Act, 1976 to cite a few examples.

21. पुढीलपैकी कोणकोणत्या गोष्टींचा दिलेल्या उताऱ्यामध्ये उल्लेख केला आहे?

(अ) 42वी घटनादुरुस्ती

(ब) अनुच्छेद 368

(क) घटनेतील भाग 3, भाग 4, भाग 4 ए

पर्याय

(1) अ आणि ब
(2) अ आणि क
(3) ब आणि क
(4) वरीलपैकी सर्व

Which of the following things are mentioned in the given passage?

(a) $42^{nd}$ constitutional amendment.

(b) Article 368

(c) Part III, Part IV, Part IV A in the constitution

Options

(1) a and b
(2) a and c
(3) b and c
(4) all of the above

---

22. ________ पासून भारतात न्यायालयीन वर्चस्वाचे युग सुरू झाले.

(1) 42वी घटनादुरुस्ती 1976
(2) मिनर्व्हा मिल्स खटला
(3) केशवानंद भारती खटला
(4) घटनेत भाग 4 ए च्या समावेशानंतर

__________ marks the beginning of an era of judicial supremacy in India.

(1) 42nd constitutional amendment, 1976
(2) Minerva Mills case
(3) Kesavananda Bharati case
(4) Introduction of part IV A in the constitution

---

23. खालील विधाने काळजीपूर्वक वाचा आणि योग्य पर्याय निवडा.

(अ) 1951 मध्ये नवव्या अनुसूचींचा समावेश घटनेत केल्यापासून एकंदर 284 कायद्यांना या अनुसूचीखाली आणून संरक्षण देण्यात आले.

(ब) या अनुसूचित केवळ जमीन सुधारणांशी संबंधित कायदे आहेत.

पर्याय

(1) अ बरोबर, ब चूक
(2) ब बरोबर, अ चूक
(3) दोन्ही विधाने बरोबर
(4) दोन्ही विधाने चूक

Read the following statements carefully and choose the correct option.



चाणक्य मंडल परिवार

(a) Since the insertion of the Ninth schedule into the constitution in 1951, 284 statutes have come under its protection.

(b) This schedule contains statutes related to land reforms only.

Options

(1) a correct, b incorrect (2) b correct, a incorrect

(3) Both statements correct (4) Both statements incorrect

**24.** पुढीलपैकी अयोग्य विधान कोणते?

(1) केशवानंद खटल्याने संसदेचा घटनादुरुस्ती अधिकार मर्यादित केला होता.

(2) 42व्या घटनादुरुस्तीमुळे संसदेच्या घटनादुरुस्तीच्या अधिकारात बदल झाला व तो अमर्यादित झाला.

(3) मिनर्व्हा मिल्स या याचिकेत याचिकाकर्त्यांनी घटनेतील कलम 55च्या वैधतेला आव्हान दिले.

(4) वरीलपैकी सर्व विधाने बरोबर

Which of the following statements is incorrect?

(1) Kesavanand case limited the parliament's amending power over the constitution.

(2) 42nd constitutional amendment transformed the Parliament's amending power over the constitution into an unlimited one.

(3) In Minerva Mills, the petitioners challenged the validity of article 55 in the constitution.

(4) All of the above statements are correct.

**25.** 42व्या घटनादुरुस्तीमुळे झालेल्या बदलांमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होतो?

(अ) घटनेमध्ये भाग 4 A चा अंतर्भाव

(ब) प्रास्ताविकात समाजवादी व धर्मनिरपेक्ष या संज्ञांचा अंतर्भाव

(क) संसदेचा घटनादुरुस्ती अधिकार मर्यादित झाला.

(ड) केंद्र सरकार अधिक शक्तीशाली केले गेले.

पर्याय

(1) अ, ब आणि क (2) अ, ब आणि ड

(3) ब, क आणि ड (4) वरीलपैकी सर्व

Which of the following are included in the changes made by 42nd amendment of the constitution?

(a) insertion of part IV A into the constitution

(b) insertion of the expressions socialist and secular into the Preamble

(c) Parliament's amending power over the constitution was limited by it.

(d) Strengthened the position of the Central Government.

Options

(1) a, b and c (2) a, b and d

(3) b, c and d (4) all of the above



चाणक्य मंडल परिवार

**प्रश्न क्र. 26 ते 30 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

पृथ्वीवरील एका स्थानावर g चे मूल्य सगळ्या वस्तूंसाठी एकसमान असते. म्हणून कुठल्याही दोन वस्तू एका उंचीवरून सोडल्यास, एकाच वेळेस जमिनीवर पोहोचतात. त्यांचे वस्तुमान व इतर कुठल्याही गुणधर्माचा कालावधीवर परिणाम होत नाही. असे म्हटले जाते की, गॅलिलिओने सुमारे इ.स. 1590 मध्ये इटली देशातील पीसा या शहरात एक प्रयोग केला. दोन वेगवेगळ्या वस्तुमानाचे गोल तेथील झुकलेल्या मनोऱ्यासमोर एकाच वेळेस खाली सोडले तर ते एकाच वेळेस जमिनीवर पडतात हे सिद्ध झाले.

आपण एक जड दगड आणि एक पीस जर उंचीवरून एकाच वेळेस सोडले तर ते एकाच वेळेस जमिनीवर पोहोचताना दिसत नाहीत. पिसाचे हवेशी होत असलेल्या घर्षणामुळे व प्रयुक्त होणाऱ्या प्रावक बलामुळे पीस तरंगत हळूहळू खाली येते व जमिनीवर उशीरा पोहोचते. हवेमुळे प्रयुक्त होणारे बल दगडाच्या वजनापेक्षा खूप कमी असते व दगडाच्या गतीवर परिणाम करण्यास कमी पडते. तथापि शास्त्रज्ञांनी हा प्रयोग निर्वातात केला असून दगड आणि पीस दोन्ही एकाच वेळेस जमिनीवर पोहोचतात हे सिद्ध केले आहे.

बोलीभाषेत आपण वजन या शब्दाचा वापर 'वजन' व 'वस्तुमान' या दोन्ही अर्थानी करतो व एखाद्या वस्तूचे वजन हे kg मध्ये म्हणजे वस्तुमानाच्या एककात मोजतो. परंतु जेव्हा आपण 'राजीवचे वजन 75 kg आहे' असे शास्त्रीय भाषेत म्हणतो तेव्हा आपण राजीवचे वस्तुमान सांगत असतो. '75 kg वस्तुमानावर जेवढे गुरूत्वीय बल प्रयुक्त होते तेवढे राजूचे वजन आहे' असे आपल्याला अभिप्रेत असते. राजीवचे वस्तुमान 75 kg असल्यामुळे पृथ्वीवर त्याचे वजन $F = mg = 75 \times 9.8 = 735$ N असते. 1 kg वस्तुमानाचे वजन $1 \times 9.8 = 9.8$ N असते.

समुद्रात नियमितपणे येणाऱ्या भरती व ओहोटी बद्दल तुम्हाला माहितच असेल. एका किनाऱ्यावरील समुद्राच्या पाण्याची पातळी दिवसातून नियमित कालावधीने दोन वेळा वाढते व कमी होते. वेगवेगळ्या स्थानांवर भरती व ओहोटीची वेळ वेगवेगळी असते. समुद्राच्या पाण्याची पातळी चंद्राच्या गुरुत्वीय आकर्षणामुळे बदलते.

**गुरुत्वीय लहरी (Gravitational waves)**

पाण्यात दगड टाकल्यावर त्यावर लहरी निर्माण होतात, तसेच एका दोरीची दोन्ही टोके धरून हालविल्यास लहरी निर्माण होतात हे तुम्ही पाहिले असेलच. प्रकाश हा देखील एक प्रकारचा तरंग आहे. त्यास विद्युतचुंबकीय तरंग असे म्हणतात. खगोलीय वस्तू हे तरंग उत्सर्जित करतात व आपण आपल्या उपकरणांद्वारे त्यांना ग्रहण करतो. विश्वाबद्दलची संपूर्ण माहिती आपल्याला या लहरींद्वारेच मिळालेली आहे.

गुरुत्वीय लहरी ह्या अगदी वेगळ्या प्रकारच्या लहरी आहेत. त्यांना अवकाश काळावरील लहरी असे म्हटले आहे. त्यांच्या अस्तित्वाची शक्यता आईनस्टाईनने 1916 मध्ये वर्तवली होती. ह्या लहरी खूप क्षीण असल्याने त्यांना शोधणे खूप कठीण असते. खगोलीय वस्तूंमधून उत्सर्जित झालेल्या गुरुत्वीय लहरींना शोधण्यासाठी शास्त्रज्ञांनी अनेक संवेदनशील उपकरणे विकसित केली आहेत. यामध्ये LIGO (Laser Interferometric Gravitational Waves Observatory) हे प्रमुख आहे. शास्त्रज्ञांनी सन 2016 मध्ये आईनस्टाईनच्या भाकितानंतर बरोबर 100 वर्षांनी खगोलीय स्रोतांपासून येणाऱ्या गुरुत्वीय लहरींचा शोध लावला आहे. या शोधात भारतीय शास्त्रज्ञांचे लक्षणीय योगदान आहे. या शोधामुळे विश्वाची माहिती मिळविण्याचा एक नवीन मार्ग खुला झाला आहे.

**Read the following passage and answer the questions from 26 to 30.**

The value of g is the same for all objects at a given place on the earth. Thus, two objects, irrespective of their masses or any other properties, when dropped from same height and falling freely will reach the earth at the same time. Galileo is said to have performed an experiment around 1590 in the Italian city of Pisa. He dropped spheres of different masses from the leaning tower of Pisa to demonstrate that the spheres reached the ground at the same time.

When we drop a feather and a heavy stone at the same time from a height, they do not reach the earth at the same time. The feather experiences a buoyant force and frictional force due to air and therefore floats and reaches the ground slowly, later than the heavy stone. The buoyant and frictional forces on the stone are much less than the weight of the stone and does not affect the speed of the stone much. Recently scientists performed this experiment in vacuum and showed that the feather and stone indeed reach the earth at the same time.

Colloquially we use weight for both mass and weight and measure the weight in kilograms which is the unit of mass. But in scientific language when we say that Rajeev's weight is 75 kg, we are talking about Rajeev's mass. What we mean is that Rajeev's weight is equal to the gravitational force on 75 kg mass. As Rajeev's mass is 75 kg. weight on earth is $F = mg = 75 \times 9.8 = 735$ N. The weight of 1 kg mass is $1 \times 9.8 = 9.8$ N.

You must be knowing about the high and low tides that occur regularly in the sea. The level of sea water at any given location along at regular intervals. High and low tides occur at different times at different places. The level of water in the sea changes because of the gravitational force exerted by the moon.

**Gravitational waves**

Waves are created on the surface of water when we drop a stone into it. Similarly you must have seen the waves generated on a string when both its ends are held in hand and it is shaken. Light is also a type of wave called the electromagnetic wave. Astronomical objects emit these waves and we receive them using our instruments. All our knowledge about the universe has been obtained through these waves.

Gravitational waves are a very different type of waves. They have been called the waves on the fabric of space-time. Einsteine predicted their existence in 1916. These waves are very weak and it is very difficult to detect them. Scientists have constructed extremely sensitive instruments to detect the gravitational waves emitted by astronomical sources. Among these, LIGO (Laser Interferometric Gravitational Wave Observatory) is the prominent one. Exactly after hundred years of their prediction, scientists detected these waves coming from an astronomical source. Indian scientists have contributed significantly in this discovery. This discovery has opened a new path to information about the Universe.



चाणक्य मंडळ परिवार

26. जेव्हा आपण एखाद्याचे वजन 45 किलोग्रॅम आहे असे म्हणतो तेव्हा त्यांचे वस्तुमान आणि वास्तविक वजन अनुक्रमे किती असते?

(1) 45 N आणि 450 किग्रॅ
(2) 45 N आणि 441 किग्रॅ
(3) 45 किग्रॅ आणि 441 N
(4) वरीलपैकी एकही नाही

When we say someone's weight is 45 kg what is their mass and actual weight respectively ?

(1) 45 N and 450 kg
(2) 45 N and 441 kg
(3) 45 kg and 441 N
(4) None of the above

---

27. **योग्य** विधान/ने ओळखा.

(अ) वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळी भरती आणि ओहोटी येतात.
(ब) ते चंद्राच्या गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे प्रभावित होतात.
(क) समुद्राच्या पाण्याची पातळी दिवसातून दोनदा बदलते

(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त ब आणि क
(3) फक्त अ आणि क
(4) वरीलपैकी सर्व

Identify the **correct** statement/s.

(a) High and low tides occur at the same time at different places.
(b) They are affected by the gravitational force exerted by the moon.
(c) The level of sea water changes twice a day

(1) Only a and b
(2) Only b and c
(3) Only a and c
(4) All of the above

---

28. पिसाचा झुकलेला मनोरा कोणत्या देशात आहे?

(1) स्पेन
(2) भारत
(3) इटली
(4) ग्रीस

The leaning tower of Pisa is located in which country ?

(1) Spain
(2) India
(3) Italy
(4) Greece



चाणक्य मंडल परिवार

29. पीस जमिनीवर दगडापेक्षा हळू का पोहोचते?

(1) दगडापेक्षा पिसावर गुरुत्वाकर्षण जास्त काम करते.

(2) हवेच्या प्लावक आणि घर्षण बलामुळे.

(3) कारण दगड जड आहे.

(4) कारण पीस दगडापेक्षा हलके असते.

Why does the feather reach the ground slower than the stone ?

(1) The gravity acts more heavily on the feather than the stone.

(2) Due to the buoyant and frictional force of the air.

(3) Because the stone is heavy.

(4) Because the feather is lighter than the stone.

---

30. गुरुत्वीय लहरींबद्दल खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत?

(अ) त्या खूप क्षीण असून त्यांना शोधणे कठीण आहे.

(ब) आइन्स्टाईनने 1619 मध्ये त्यांच्या अस्तित्वाची शक्यता वर्तवली होती.

(क) LIGO हे या लहरी शोधण्यासाठी वापरले जाणारे उपकरण आहे.

(1) फक्त अ आणि ब

(2) फक्त ब आणि क

(3) फक्त अ आणि क

(4) वरीलपैकी सर्व

Which of the following statements about the Gravitational waves are true?

(a) They are very weak and difficult to detect.

(b) Einstein predicted their existence in 1619.

(c) LIGO is the instrument used to detect the waves.

(1) Only a and b

(2) Only b and c

(3) Only a and c

(4) All of the above



चाणक्य मंडल परिवार

**प्रश्न क्र. 31 ते 35 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

कोणत्याही वनस्पतीची प्ररोह संस्था (Shoot System) प्रकाश उद्दिपनास प्रतिसाद देते. म्हणजेच प्रकाश स्रोताच्या दिशेने तिची वाढ होते. वनस्पतींनी दाखवलेल्या या हालचालीस प्रकाशानुवर्ती हालचाल (Phototropic movement) असे म्हणतात.

वनस्पतींची मूळ संस्था (Root System) गुरुत्वाकर्षण व पाणी या उद्दिपनांना प्रतिसाद देते. या प्रतिसादांना अनुक्रमे गुरुत्वानुवर्ती (Gravitropic Movement) व जलानुवर्ती (Hydrotropic movement) असे म्हणतात. विशिष्ट रसायनांना दिलेला प्रतिसाद म्हणून वनस्पतीच्या भागांना झालेल्या हालचालीस रसायन-अनुवर्तन (Chemotropism) असे म्हणतात. उदा. बीजांडाच्या दिशेने होणारी परागनलिकेची वाढ. वरील सर्व प्रकारच्या हालचाली व वनस्पतींच्या वाढीशी संबंधित आहे म्हणून या हालचालींना वनस्पतींमधील वृद्धी संलग्न हालचाली असे म्हणतात.

बारकाईने पाहिले असता लाजाळूसारख्या वनस्पतीला ज्या ठिकाणी स्पर्श होतो, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणीही हालचाल होते. यावरून आपण असे अनुमान काढू शकतो की स्पर्श झाला आहे ही माहिती वनस्पतीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रसारित झाली असली पाहिजे. ही माहिती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्यासाठी वनस्पती विद्युत-रासायनिक आदेशांचा उपयोग करतात. वनस्पती पेशी त्यांच्यातील पाण्याचे प्रमाण कमी जास्त करून आपला आकार बदलतात व वनस्पतीची हालचाल घडवून आणतात.

वनस्पतीतील काही विशिष्ट हालचालींचे पर्यवसन त्यांच्या वाढीत होत नाही. अशा हालचालींना वृद्धी असंलग्न हालचाल असे म्हणतात. भोवतालच्या परिसरातील बदलांना प्रतिसाद म्हणून वनस्पतीतील संप्रेरके वनस्पतींमध्ये विविध प्रकारच्या हालचाली घडवून आणतात.

मानवी शरीरात एकाच वेळी विविध क्रिया घडून येत असतात. त्या क्रियांचे उत्तम प्रकारे व परिणामकारकरित्या समन्वयन व नियंत्रण करणे जरुरीचे असते. ते दोन यंत्रणांद्वारे केले जाते.

**चेतापेशी** - शरीरात एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी संदेशवहनाचे कार्य करणाऱ्या विशेष प्रकारच्या पेशींना चेतापेशी (Neurons) असे म्हणतात. चेतापेशी या मानवी चेतासंस्थेतील रचनात्मक व कार्यात्मक घटक आहेत. मानवी शरीरात आकाराने सर्वात मोठ्या असणाऱ्या चेतापेशींची लांबी काही मीटरपर्यंत भरते. चेतापेशींमध्ये विद्युत रासायनिक आवेग निर्माण करण्याची व वहन करण्याची क्षमता असते. चेतापेशींना आधार देणाऱ्या व त्यांच्या कार्यात मदत करणाऱ्या पेशींना चेताबंध (Neuroglia) असे म्हणतात. चेतापेशी आणि चेताबंध यांच्या सहाय्याने चेता (Nerves) बनतात.

**Read the following passage and answer the questions from 31 to 35.**

The shoot system of any plant responds to the light stimulus i.e. it grows towards the source of light. The movement shown by plants towards the source of light is called 'Phototropic movement'.

The root system of plants responds to stimuli like gravitation and water. These responses are called 'gravitropic movement' and 'hydrotropic movement respectively.

Movement shown by plants in response to specific chemicals is called chemotropic movement. For exmaple, the growth of the pollen tube towards the ovule.

All the above-mentioned movements of plants are related with growth; hence all such movements are collectively called growth relevant movements".

On careful observation it is seen that in plants like touch-me-not (Mimosa), movement also accurs at the places other than where It has been touched. Hence, we can infer that the information about the touch must have been relayed within the plant from one place to another. Plants use electro chemical Impulses for transfer of information from one place to another. Plant cells change their shape by increasing or decreasing their water content and thereby bring about the movements of plants.

Some specific movements of the plants do not lead to the plant's growth. Such movements are called 'growth Irrelevant movements'. As a response to changes in the surroundings, plant hormones bring about various movements in plants.

**Neurons (Nerve cells) :** Special types of cells which conduct impulses from one place to another in the body are called neurons. Neurons are the structural and fuctional units of the nervous system. Nerve cells, the largest cells in the human body, may measure up to a few meters in length. Nerve cells have the ability to generate and conduct electro chemical impulses. The cells that support the nerve cells and help in their functioning are called neuroglia. Nerve cells and neuroglial cells together from the nerves.

31. मानवी शरीरातील सर्वात लांब पेशी कोणती आहे?

(1) चेतापेशी (2) चेताबंध
(3) त्वचापेशी (4) वरीलपैकी काहीही नाही

Which is the longest cell in the human body ?

(1) Neuron (2) Neuroglia
(3) Skin cells (4) None of the above

32. वनस्पती त्यांचा आकार कसा बदलतात?

(1) विद्युत रासायनिक आदेशांचा उपयोग करून
(2) त्यांच्यातील पाण्याचे प्रमाण वाढवून किंवा कमी करून
(3) सूर्यप्रकाश शोषून
(4) वनस्पती त्यांचा आकार बदलू शकत नाहीत

How do plants change their shape ?

(1) By using electrochemical impulses
(2) By increasing or decreasing their water content
(3) By absorbing sunlight
(4) Plants can not change their shape

---

33. चेता कशामुळे बनते?

(1) न्यूरॉन आणि चेतापेशी
(2) चेतापेशी आणि चेताबंध
(3) चेताबंध आणि यकृताच्या पेशी
(4) चेतापेशी आणि दैहिक पेशी

What forms a Nerve?

(1) Neurons and nerve cells
(2) Nerve cells and neuroglial cells
(3) Neuroglial and hepatic cells
(4) Nerve cells and somatic cells

---

34. बीजांडाच्या दिशेने परागनलिकेची वाढ ...... आहे.

(1) प्रकाशानुवर्ती हालचाल
(2) गुरुत्वानुवर्ती हालचाल
(3) रासायनुवर्ती हालचाल
(4) जलानुवर्ती हालचाल

Growth of the pollen tube towards the ovule is........

(1) Phototropic Movement
(2) Gravitropic Movement
(3) Chemotropic Movement
(4) Hydrotropic Movement

---

35. खालीलपैकी कोणते एकपेशीय प्राणी आहेत?

(अ) अमिबा
(ब) एन्टअमिबा हिस्टोलिटिका
(क) पॅरामेशियम

(1) फक्त अ
(2) फक्त अ आणि ब
(3) फक्त अ आणि क
(4) यापैकी नाही

Which of the following are unicellular animals ?

(a) amoeba
(b) entamoeba histolytica
(c) paramecium

(1) Only a
(2) Only a and b
(3) Only a and c
(4) None of the above



चाणक्य मंडल परिवार

**प्रश्न क्र. 36 ते 40 : खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची योग्य उत्तरे द्या.**

संघराज्यवादाची कल्पना जुनीच आहे. त्यात वेगवेगळ्या पातळीवरील राज्यांना एकत्र आणण्याची ताकद असते. ग्रीसमध्ये अशी छोटी राज्ये व शहरे यांना असे एकत्र आणले गेले, उत्तर भारतात ख्रि. पू. सहाव्या शतकात लिछावी राज्य हे प्रजासत्ताक पद्धतीचे उत्तम उदाहरण होते. आधुनिक जगात प्रजासत्ताकाची ही पद्धत आणखीनच लोकप्रिय ठरली असून त्यात अमेरिका, ब्राझील, मेक्सिको व भारत यांसारखे मोठे देश आहेत.

तज्ज्ञांच्या मते जगात संघराज्यांच्या वेगवेगळ्या प्रकारांची सरमिसळ सापडते पण त्याचे एकच एक असे प्रारूप नाही. मॉंटेस्क्यू याने स्वायत्त शहर राज्य प्रजासत्ताकाच्या संघराज्याची संकल्पना मांडली होती. जेम्स मॅडिसनसारख्या संघराज्यवाद्यांनी संयुक्त प्रजासत्ताकाची कल्पना मांडली होती. पण त्यात स्थानिक संकुचित हितांना केंद्र सरकार धुडकावून लावते अशी ती कल्पना होती. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांचा असा विश्वास होता की, सांस्कृतिक, वांशिक व भाषिक विविधता असतानाही एकात्मता असलेल्या आपल्या देशात जरी काही प्रमाणात राज्यांचे मतभेदअसले तरी भारताचे संघराज्यवाद हे प्रमुख वैशिष्ट्य आहे. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व इतर राष्ट्रीय नेत्यांनीही या संकल्पनेला मान्यता दिलेली होती. गांधीजींचे मत मात्र वेगळे होते. अधिकारांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे अगदी पंचायत पातळीपर्यंत अधिकार मिळाले पाहिजेत असे त्यांचे मत होते.

जागतिकीकरणामुळे संघराज्यवादाच्या संकल्पनेवर मोठा परिणाम झाला असून जगातील अनेक देश अधिक एकात्म झाले आहेत. बाह्य राजकीय व आर्थिक शक्ती त्यांच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालू शकत नाहीत. त्यामुळे लोकशाही संस्था काहीशा कमकुवत झाल्या. या नव्या प्रक्रियेला स्पर्धात्मक संघराज्यवाद म्हणतात. त्यात प्रादेशिक सरकारेही गुंतवणुकीसाठी केंद्राशी स्पर्धा करतात, भांडवल मिळवण्यासाठी, तंत्रज्ञानाचे फायदे मिळवण्यासाठी ही स्पर्धा असते. भारतातील संघराज्यवाद हा सहकारात्मक संघराज्यवाद आहे. त्यात अनेक आर्थिक बाबतीत केंद्राची राज्यांवरील पकड ढिली होत चालली आहे. केवळ धोरणात्मक विषयावर मात्र केंद्राचे मर्यादित नियंत्रण आहे. सहकारात्मक संघराज्यवादात जास्त फायदे देणारे अनेक मार्ग आहेत. परंतु त्यात देश या संकल्पनेलाही सोडलेले नाही. टॉक्युव्हिले याने तसे म्हणूनच ठेवले होते. त्या मार्गाने आपली वाटचाल चालू आहे.

खरा संघराज्यवाद हा लोकशाहीचा पाया व्यापक करणारा व मुळे खोलवर रूजवणारा असतो. त्याच भाषांची विविधता, सांस्कृतिक वैविध्य, वांशिक व धार्मिक विविधता याच राजकीय व नागरी संस्कृतीच्या अस्तित्वाच्या खुणा असतात. भारताच्या बाबतीत संघराज्यवादाची संकल्पना ही गौतम बुद्धांच्या काळातील आहे.

ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात लिछावी व शाक्य ही दोन प्रजासत्ताक होती. तेथे संथागार नावाची एक संस्थात्मक व्यवस्था होती. तिथे प्रजासत्ताकातील अनेक मुद्द्यांवर वादविवाद होत असत. त्यात संघराज्यातील घटकांनाही समाविष्ट करून घेतले जाई. बुद्धांनी शाक्य संथागार सुरू केले तेव्हा ते वीस वर्षांचे होते. अठ्ठावीस वर्षांचे असताना रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून शाक्य व कोळिया यांच्यात वाद निर्माण झाला होता. शाक्य लष्कराच्या कमांडरच्या मते या प्रश्नावर कोळियांशी युद्ध करायला हवे होते पण सिद्धार्थाने त्याला विरोध केला व या प्रश्नावर घेण्यात आलेल्या मतदानात दुर्दैवाने सिद्धार्थाच्या शांती प्रस्तावाचा पाडाव झाला व त्याला विजनवासात जावे लागले. तरी प्रजासत्ताकाची कल्पना त्याने मांडली व तंटे सोडवण्यासाठी बळाचाच वापर करावा लागतो असे नाही हा नवा वस्तुपाठ घालून दिला. प्रजासत्ताक या संकल्पनेचा तो नंदादीप अजूनही अनेक देशांना मार्ग दाखवतो आहे.

**Read the following passage and answer the questions from 36 to 40.**

The idea of federalism as an organising principle between different levels of a state is quite old. Greek city states had it. Lichchavi kingdom of northern India In the 6th century BC is a celebrated example of a republican system. In the modern world, this continues to be the most popular system in larger countries like US, Brazil, Mexico and India.

Scholars have noted that there is a "federalist ferment' across the world but there is no single model of federalism. While Montesquieu talked about the 'confederate republic constituted by sovereign city states', federalists like James Madison pleaded the case for a 'compound republic' with an 'overarching central government that can override against narrow local interests'. The architect of Indian Constitution, Baba Saheb Ambedkar believed that for a culturally, ethnically and linguistically diverse and heterogeneous country like India, federalism was the 'chief mark', though with a strong unitary bias. This understanding, which was shared by Pt. Jawaharlal Nehru, Sardar Patel and other national leaders stood at sharp variance with Gandhi's idea of federalism who was a votary of decentralisation and devolution of power to the lowest unit of Panchayat.

Globalisation has also deeply Impacted the concept of federalism. As the countries of the world become more and more tightly integrated, the external influence of powerful financial and political entities tends to limit the freedom of action on the part of states. It is often reflected in the weakening of public institutions. This process has also generated a phase of competitive federalism' where provincial governments compete with the centre to attract Investment, garner capital and technology for their benefit. India, on the other hand, has taken forward the path of cooperative federalism by gradually loosening the control of the central government over the states in financial matters and restricting itself more and more to policy issues in certain areas only. It can be argued that cooperative federalism could be the path to make best use of the different advantages of the magnitude and littleness of nations as Tocqueville had once remarked.

It is important to underline that federalism, in it's true sense, can be successful only by broadening the base of democracy and deepening its roots. In the case of India, a deep respect for diversity of languages, cultures, ethnicity and religion as hallmarks of its political and civilizational existence could nourish federalism and strengthen the nation. It is the only way India could take forward its great tradition of federalism which goes back to the time of Buddha.

Let us end with a story. Around 5 century BC, the republican states of Lichchavi and Sakya had an institutional system called Santhagara which was used to debate issues of vital importance to the republic, including disputes between various constituents of

the republic. Buddha was initiated into the Sakya Santhagara at the age of 20. When he was 28, there was a dispute over sharing of water of Rohini river between the Sakyas and Koliyas. The Sakya military commander was in favour of war on Koliyas which Siddhartha opposed. But the peace proposal of Siddhartha was defeated miserably during voting, Siddhartha had to face exile. Buddha may have been defeated and exiled but the idea of the republic and settling of disputes without the use of force has survived. The republican spirit has survived as a guiding spirit for nations.

36. खालील विधानापैकी **चुकीचे** विधान ओळखा.

(अ) संघराज्यवादाची कल्पना खूप जुनी आहे.

(ब) भारतीय संघराज्यवादाची संकल्पना ही बुद्धांच्या काळातील आहे.

(क) ख्रि. पु. सहाव्या शतकात लिछावी राज्य हे प्रजासत्ताक पद्धतीचे राज्य होते.

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क

(3) फक्त अ आणि क (4) एकही नाही

Identify the **incorrect** statement from the following statements.

(a) The idea of federalism is very old.

(b) The concept of Indian federalism dates back to the time of Buddha.

(c) In the sixth century BC, Lichhavi was a republic.

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a and c (4) None of the above

---

37. कोणत्या संघराज्यवाद्याचा उल्लेख सदर उताऱ्यामध्ये केलेला आहे?

(1) मॉंटेस्क्यू

(2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(3) गौतम बुद्ध

(4) जेम्स मॅडिसन

Which federalist is mentioned in this passage?

(1) Montesquieu

(2) Dr.Babasaheb Ambedkar

(3) Gautama Buddha

(4) James Madison



चाणक्य मंडळ परिवार

38. स्पर्धात्मक संघराज्य वादामध्ये कशाचा अंतर्भाव होतो?

(अ) प्रादेशिक सरकारे तंत्रज्ञानाचे फायदे मिळवण्यासाठी केंद्र शासनाशी स्पर्धा करतात.

(ब) प्रादेशिक सरकारे भांडवल मिळवण्यासाठी केंद्राशी स्पर्धा करतात.

(क) प्रादेशिक सरकारे गुंतवणुकीसाठी केंद्र सरकारशी स्पर्धा करतात.

(1) फक्त क (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त अ आणि क (4) फक्त अ, ब आणि क

What is included in competitive federalism?

(a) Provincial governments compete with the central government for the benefits of technology.

(b) Provincial governments compete with the Centre for capital.

(c) Provincial governments compete with the central government for investment.

(1) Only c (2) Only a and b

(3) Only a and c (4) Only a, b and c.

---

39. खालीलपैकी कोणी सत्तेच्या विकेंद्रीकरणास पाठिंबा दर्शवला होता?

(1) पंडित जवाहरलाल नेहरू

(2) सरदार वल्लभभाई पटेल

(3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(4) गांधीजी

Which of the following supported decentralization of power?

(1) Pandit Jawaharlal Nehru

(2) Sardar Vallabhbhai Patel

(3) Dr. Babasaheb Ambedkar

(4) Gandhiji

---

40. कोणत्या नदीच्या पाणीवाटपावरून कोणत्या दोन प्रजासत्ताक राज्यांमध्ये वाद निर्माण झाला होता?

(1) रोहिणी नदी, लिछावी आणि शाक्य

(2) लुम्बीनी नदी,शाक्य आणि कोळिया

(3) रोहिणी नदी, शाक्य आणि कोळिया

(4) लुम्बीनी नदी,लिछावी आणि शाक्य

Which of these two republics had a dispute over the sharing of water from which river?

(1) Rohini River, Lichchavi and Sakya

(2) Lumbini River, Sakya and Koliya

(3) Rohini river, Sakya and Koliya

(4) Lumbini river, Lichchavi and Sakya

चाणक्य मंडल परिवार

**प्रश्न क्र. 41 ते 45 : खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे द्या.**

देवाच्या अशा वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवहारामागचे कारण शहाणे लोकच जाणतात. ते कारण म्हणजे अर्थातच भाव. अंतःकरणात भाव नसेल तर कर्म काय किंवा ज्ञान काय निरर्थक आणि निष्फळ ठरते. याचे आणखी एका उदाहरण तुकोबा देतात, यज्ञ हे ईश्वराचे मुख मानून त्यात देण्यात येणारी आहुती ईश्वरार्यंत पोचते, असा कर्ममार्गी लोकांचा विश्वास असतो; पण या प्रक्रियेत ईश्वरापेक्षा यज्ञाचेच स्तोम अधिक वाढते. विशिष्ट कर्माच्या सामर्थ्यामुळे ईश्वराला प्रसन्न होणे भागच पडेल असे या कर्मकांडात अभिप्रेत असते. त्यामुळे ईश्वरही या यज्ञक्रियेतील बारीकसारीक तपशीलातील चुकांवर बोट ठेवून याज्ञिकांच्या खोड्या काढून त्यांना चकवतो. इच्छित फळाच्या ऐवजी भलतेच फळ देतो. मंत्रोच्चार करताना एखादा शब्द मागे-पुढे झाला, स्वर खालीवर झाला तरी त्याचे विपरीत परिणाम घडू शकतात. याउलट हाच ईश्वर शबरीसारख्या भिल्लिणीने भावपूर्वक अर्पण केलेली बोरेसुद्धा मिटक्या मारीत गट्ट करतो. हा सारा भावाचा महिमा आहे. भावाशिवाय काहीही करणे हा शीण होय.

मुक्ताबाईंच्या संदर्भात एखाद्याला त्यांचे एकूणच व्यक्तिमत्त्व अलौकिक होते, असे वाटू शकते. जनाबाई आणि बहिणाबाई यांच्या बाबतीत मात्र असे वाटण्याची सोय नाही. बहिणाबाईंचा विवाह त्या लहान असतानाच एका प्रौढ पुरुषाशी करून देण्यात आला. मध्ययुगीन कोणत्याही चारचौघींमध्ये सामावण्यासारखे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्माचे आकर्षण होते. कौटुंबिक पार्श्वभूमी; तसेच परंपराही एकदम प्रतिकूल. अगदी 'नामाचा विटाळ आमुचिये घरी। गीताशास्त्र कुळी वैरी आम्हा।।' असे म्हणता यावे इतके. त्यात परत, 'वेद देती हाका पुराणे गर्जती। स्त्रियेच्या संगती हित नव्हे।।' 'मी तो सहजचि स्त्रियेचाचि देह। परमार्थाची सोय कैसी आता।।'

या प्रतिकूलतेचे रूपांतर अनुकूलतेत झाले, ते तुकोबांची भेट झाली, त्यांच्याकडून उपदेशात्मक अनुग्रह मिळाला म्हणून. 'बहिणीस भेटला तुका। महावाक्य झाले फुका।।' औपनिषदिक महावाक्यांचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा त्यांना स्त्री असल्याने अधिकारच नव्हता; पण तुकोबांमुळे त्यातील ज्ञान मिळू शकले व त्या अध्यात्मातील वरच्या पायरीवर पोहोचू शकल्या. त्यांचे सातआठशे अभंग उपलब्ध आहेत. बडोदे येथील डॉ. शालिनी जावडेकर यांनी बहिणाबाईंच्या गाथेचे उत्तम संपादन केले आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या अभंगांत बौद्ध तत्त्वज्ञ अश्वघोषकृत 'वज्रसूचि' नामक उपनिषदाचा अनुवादही समाविष्ट आहे. जन्मसिद्ध ब्राह्मण्याच्या कल्पनेवर हल्ला चढविणारी ही कृती एकोणिसाव्या शतकातील परमहंस सभा व सत्यशोधक समाजातील विचारवंतांना प्रेरक ठरली होती.

बहिणाबाईंचे महत्त्वाचे योगदान म्हणजे, तुकोबांचे महत्त्व समजून घेऊन, त्याची मूल्यमापनात्मक ओळख करून देणे. तुकोबांच्या अभंगाला त्या 'तुकाराम वेद' असे म्हणतात. आता अभंग वेदांच्या ऋचांसारखे असतील, तर स्वतः तुकोबा मंत्रद्रष्टे ऋषी ठरणारच. बहिणाबाईंनी तोही निष्कर्ष स्पष्ट नोंदविला. 'महाराष्ट्र भाषेत वेदांताचा अर्थ। बोलिला लोकांत सर्वद्रष्टा।।' ही त्यांची पंक्ती खूप काही सांगून जाते.

बहिणाबाईंना कवित्वाची स्फूर्तीही तुकोबांनीच दिली; त्यामुळे त्यांनी रचलेले अभंग हे तुकोबांच्या विचारांचे विस्तारीकरण आहे. काही ठिकाणी तुकोबांकडून राहून गेलेले मुद्दे त्यांनी मांडले आहेत. बहिणाबाईंच्या गाथेचे वाचन केल्याशिवाय तुकोबांची गाथा पूर्ण वाचली, असे म्हणता येत नाही. ते तुकाराम गाथेचे खिल पर्व, म्हणजे परिशिष्ट आहे. जसे महाभारताचे हरिवंश.

41. 'जसे महाभारताचे महावंश' असा उल्लेख परिच्छेदामध्ये झाला आहे. याचा अर्थ काय?

(अ) याचे वाचन केल्याशिवाय महाभारत समजत नाही.

(ब) हे वेदांचे परिशिष्ट समजले जाते.

(क) यामुळे महाभारत व्यवस्थित समजायला मदत होते.

(1) वरील सर्व

(2) फक्त अ व ब

(3) फक्त ब

(4) फक्त अ व क

---

42. वरील परिच्छेदावरुन खालीलपैकी कोणते वाक्य अयोग्य आहे ते निवडा.

(1) देवाजवळ कर्मापेक्षा ज्ञानाला महत्त्व आहे.

(2) ज्ञानमार्गी लोक आहुतीवर सर्वात जास्त विश्वास ठेवतात.

(3) यज्ञात अंधश्रद्धेला आजिबात स्थान नाही

(4) वरीलपैकी नाही

---

43. जनाबाई यांचे गुरू कोण?

(1) संत नामदेव

(2) संत तुकाराम

(3) संत ज्ञानेश्वर

(4) यापैकी नाही

---

44. खालीलपैकी कोणते वाक्य बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल योग्य नाही?

(1) त्यांच्या घरी देवाचे नावसुद्धा चालत नसे.

(2) त्यांच्या काळात वेदाचा अभ्यास स्त्रियांना करता येत नसे.

(3) त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञान सुद्धा अभ्यासले

(4) परमहंस सभा व आर्य सभा यांना त्यांचे विचार प्रेरक ठरले.

---

45. ब्राह्मण्य पद्धतीवर हल्ला असा उल्लेख परिच्छेदात आहे. याचा भावार्थ काय आहे?

(1) ब्राह्मणांच्या विरोधातील विचारसरणी मांडणे

(2) जन्मावर आधारित ज्ञानाचे प्राबल्य नाकारणे

(3) सत्यशोधक समाजाची विचारसरणी पसरविणे

(4) यापैकी नाही



चाणक्य मंडल परिवार

**Read the following passage and answer the questions from 46 to 50**

Youth is the transition from play to work, from dependence on the family to dependence on one's self. it is little anarchic and egotistic, because in the family its every whim or want was favored by unstinting parental love. Passing into the world, youth, petted for years and now for the first time free, drinks in the deep delight of liberty and advances to conquer and remold the universe.

Good oratory, said Demosthenes, is characterized by three points - action, action, and action, but he might have said it just as well of youth. Youth is as confident and improvident as a god, It loves excitement and adventure more than food. It loves the superlative, the exaggerated, the limitless, because it has abounding energy and frets to liberate its strength It loves new and dangerous things; a man is as young as the risks he takes.

Is bears law and order grudgingly. It is asked to be quiet when noise is the vital medium of youth; it is asked to be passive when it longs for action; it is asked to be sober and judicious when its very blood makes youth "a continuous intoxication." It is the age of abandon, and its motto, undelphianty is Planta agan-"Everything in excess." It is never tired; it lives in the present, regrets no yesterdays, and dreads no morrows; it climbs buoyantly a hill whose summit conceals the other side. It is the age of sharp sensation and experience is not soured yet with repetition and disillusionment, to have sensation at all is then a sweet and glorious thing. Every moment is loved for itself, and the world is accepted as an esthetic spectacle, something to be absorbed and enjoyed something of which one may write verses, and for which one say thank the stars.

Happiness is the free play of the instincts, and so is youth. For the majority of us it is the only period of life in which we live; most men of forty are but a reminiscence, the burnt-out ashes of what was once a flame. The tragedy of Life is that it gives wisdom only when it has stolen youth. Si jewenesse sustrit es vieillesse pouvait! – "If youth knew how, and old age could."

Health lies in action, and so it graces youth. To be busy in the secret of grace, and half de secret of content. Let us ask the gods not for possessions, bet for things to do happiness is in making things rather than in consuming them. In Utopia, said Thoreau, each would bald his own home; and then song would come back to the heart of man, as it comes to the bird when it builds its nest. If we cannot build our homes,, we can at least walk and throw and run; and we should never be so old as merely to watch games instead of playing them. Let us play is as good as Let us pray, and the results are more assured.

Hence Youth is wise in preferring the athletic field to the classroom, and is rating baseball above philosophy.

46. What is the most tragic part of life?

(1) Death
(2) Its a continuous intoxication
(3) Everything is excess in life
(4) It gives us wisdom when it has stolen youth

---

47. Why asking the youth to be quiet is somewhat contradictory?

(1) Because youth loves excitement and adventure
(2) Because it loves the exaggerated and limitless
(3) Because noise is its vital medium
(4) Because its always loud and full of voice

---

48. 'Buoyantly' means .......

(1) Vigorously
(2) Happily
(3) Continuously
(4) Repeatedly

---

49. What is considered as the free play of instincts?

(a) youth
(b) happiness
(c) Health
(d) adventure
(1) Only a and b
(2) Only b and c
(3) Only a and c
(4) All of the above

---

50. How would you describe youth?

(a) it's anarchic and egoistic
(b) it's confident
(c) it is a transitionary phase between dependence on family to dependence on one's self
(d) a continuous intoxication
(1) only a, b and c
(2) only b, c ,and d
(3) only a, b and d
(4) All of the above



चाणक्य मंडल परिवार